**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या शेतकरी सन्मान निधीअंतर्गत १७ वा हप्ता शेतकऱ्यांच्या खात्यांत जमा करणार
- जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याची सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांची ग्वाही
- ईद उल अजहा, अर्थात बकरी ईद सर्वत्र उत्साहानं साजरी

  **आणि**

- पश्चिम बंगालमधे कांचनजंगा एक्सप्रेसला मालगाडीनं धडक दिल्यानं झालेल्या अपघातात ९ जणांचा मृत्यू, ३२ जण जखमी

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या उत्तर प्रदेशातल्या वाराणसीतल्या कार्यक्रमात प्रधानमंत्री शेतकरी सन्मान निधीअंतर्गत २० हजार कोटी रुपयांहून अधिक रक्कमेचा १७ वा हप्ता शेतकऱ्यांच्या खात्यांत जमा करणार आहेत. याचा लाभ नऊ कोटी २६ लाख शेतकऱ्यांना होणार आहे. या योजनेअंतर्गत आतापर्यंत ११ कोटींपेक्षा जास्त शेतकऱ्यांच्या कुटुंबांना तीन लाख कोटी रुपयांहून अधिक रक्कमेचा लाभ झाला आहे. याच कार्यक्रमात प्रधानमंत्र्यांच्या हस्ते स्वयं सहाय्यता गटातील ३० हजारांहून अधिक महिलांना **कृषी सखी** प्रमाणपत्राचं वाटप करणार आहेत. निवडक ५० कृषी विकास केंद्रांवरही विशेष कार्यक्रमांचं आयोजन यावेळी केलं जाणार आहे.

दरम्यान, प्रधानमंत्री उद्या आणि परवा उत्तर प्रदेश आणि बिहार राज्याच्या दौऱ्यावर आहेत. ते उद्या संध्याकाळी वाराणसीतल्या दशाश्वमेध घाटावर गंगा

आरतीमध्ये सहभागी होतील आणि त्यानंतर ते काशी विश्वनाथ मंदिरात जाऊन दर्शन घेतील.

बुधवारी प्रधानमंत्री बिहार दौऱ्यावर असून यावेळी त्यांच्या हस्ते राजगीर इथल्या नालंदा विश्वविद्यालयाच्या परिसराचं उद्घाटन करतील. या कार्यक्रमाला १७ देशांमधील नामवंत व्यक्ती सहभागी होणार आहेत. यावेळी प्रधानमंत्र्यांची जाहीर सभा होणार आहे.

**<><><><><>**

राज्यातल्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याची ग्वाही सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी पुण्यात झालेल्या आढावा बैठकीत दिली. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आणि जिल्हा विकास सोसायटीच्या आर्थिक सक्षमतेच्या दृष्टीनं प्रस्ताव सादर करावेत, पात्र शेतकऱ्यांना वेळेत पीक कर्ज वाटप करण्याची कार्यवाही करावी, असे निर्देश वळसे पाटील यांनी प्रशासकांना यावेळी दिले. या बैठकीला आमदार प्रविण दरेकर, आणि संबंधित विभागाचे वरीष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**<><><><><>**

वायव्य मुंबई मतदार संघातल्या निकालाला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष येत्या एक-दोन दिवसांत न्यायालयात आव्हान देणार आहे. पक्षाचे नेते आदित्य ठाकरे आणि अनिल परब आणि यांनी आज मुंबईत वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. अमोल किर्तीकर यांचा पराभव सरकारी यंत्रणेचा गैरवापर करून झाल्याचा आरोप करत त्यांनी निवडणूक आयोगाच्या कारभारावर टीका केली.

**<><><><><>**

समता परिषदेची बैठक मंत्री छगन भुजबळ यांच्या उपस्थितीत आज मुंबईत झाली. जातनिहाय जनगणना करण्याची मागणी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडे करण्याविषयी या बैठकीत चर्चा झाल्याचं भुजबळ यांनी सांगितलं. जातिनिहाय जनगणना केल्यावर ओबीसींची स्थिती स्पष्ट होईल, त्यामुळे केंद्राकडून निधी मिळेल, असं भुजबळ म्हणाले. दरम्यान, शेतकऱ्यांच्या शेतमालाला हमीभाव देऊन शेतकरी आंदोलनावर तोडगा काढावा अशी अपेक्षा भुजबळ यांनी व्यक्त केली. तसंच ओबीसी आंदोलकांना संयम बाळगण्याचं आवाहन केलं.

**<><><><><>**

ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे यांची जालना जिल्ह्यातल्या वडीगोद्री इथल्या उपोषणस्थळी आज सरकारच्या शिष्टमंडळानं भेट घेतली. पालकमंत्री अतुल सावे, खासदार संदिपान भुमरे आणि माजी केंद्रीय राज्यमंत्री भागवत कराड यांनी आंदोलकांशी चर्चा करून त्यांना उद्याच्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीला येण्याचं आमंत्रण दिलं. मात्र, आपण स्वतः चर्चेसाठी येणार नसून आपलं शिष्टमंडळ पाठवू, असं आंदोलकांनी सांगितलं. तसंच ओबीसी आरक्षणाला धक्का लागणार नाही,  असं लेखी आश्वासन सरकारकडून मिळेपर्यंत उपोषण सुरूच राहील, असं हाके आणि वाघमारे यांनी स्पष्ट केलं. दरम्यान, हाके यांच्या आंदोलनाची सरकारनं दखल घ्यावी अशी मागणी भाजपाच्या राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे यांनी केली आहे.

**<><><><><>**

लोकसभा निवडणूक मतमोजणीच्या दिवशी मतमोजणी शस्त्रधारी पोलीस संरक्षकासह प्रवेश केल्याप्रकरणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार विलास पोतनीस यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वायव्य मुंबई

लोकसभा मतदारसंघातून निवडून आलेले शिवसेनेचे उमेदवार रविंद्र वायकर यांनी निवडणूक अधिकाऱ्यांकडे तक्रार केली होती. त्यांच्या तक्रार अर्जाची दखल घेऊन गोरेगावच्या वनराई पोलिसांनी काल रात्री उशिरा पोतनीस यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला.

**<><><><><>**

भारतीय जनता पार्टीनं विधानसभा निवडणुकीसाठी केंद्रीय मंत्री भुपेंद्र यादव यांची महाराष्ट्राचे निवडणूक प्रभारी म्हणून नियुक्ती केली आहे. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव राज्याचे निवडणूक सहप्रभारी म्हणून काम पाहतील. हरियाणा, झारखंड, जम्मू आणि काश्मिर विधानसभा निवडणुकीसाठीही पक्षानं विविध केंद्रीय मंत्री, मुख्यमंत्री आणि माजी मुख्यमंत्र्यांची प्रभारी आणि सहप्रभारी म्हणून नियुक्ती केली आहे.

**<><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे उद्यापासून राज्याच्या विधानसभा मतदारसंघांचा दौरा करणार आहेत. अहमदनगर जिल्ह्यातून हा दौरा सुरु होईल. या दोन दिवसांच्या दौऱ्यात तटकरे अहमदनगर शहर, अहमदनगर दक्षिण ग्रामीण, कोपरगाव, अकोले, श्रीरामपूर नेवासा या विधानसभा मतदारसंघाचा आढावा घेणार आहे.

**<><><><><>**

ईद-उल-अजहा हा सण देशभरात उत्साहानं साजरा होत आहे. राष्ट्रपती, उपराष्ट्रपती आणि प्रधानमंत्र्यांनी देशवासियांना ईदच्या शुभेच्छा दिल्या आहेत. राज्यातही ईद उत्साहानं साजरी करण्यात आली.

**नागपूर** मध्यवर्ती कारागृहातल्या प्रार्थना भवनात जामिया अरेबीय इस्लामीया या संस्थेनं बकरी ईद निमित्त कार्यक्रमाचं आयोजन केलं होतं. बकरी ईदचा नमाज अदा करुन बंदीवानांना ईदच्या शुभेच्छा दिल्या.

**लातूर** शहरातल्या ईदगाह मैदानावर सामुहिक नमाज झाली त्यानंतर भारतासह जगभरात शांतता नांदावी म्हणून प्रार्थना झाली. निलंगा इथल्या ईदगाह मैदानावरही सामूहिक नमाज अदा करण्यात आली.

**वाशिम**मध्ये केकत उमरा रोडवरच्या ईदगाह मैदानावर तसंच इतर मशिदींमध्ये नमाज अदा करुन ईद साजरी केली.

**नाशिक** आणि मालेगाव इथंही ईदगाह मैदानावर मुख्य नमाज झाली. राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा देऊन ईद साजरी केली.

**जालना** शहरात कदीम ईदगाह मैदानावर सामुहिक नमाज अदा केल्यानंतर पारंपारिक पद्धतीनं ईद साजरी झाली.

**सोलापूर**मध्ये सर्व ईदगाह मैदानांवर सामुहिक नमाज अदा करण्यात आली. सोलापूरचे काझी सय्यद मुफ्ती महमदअली यांनी एकात्मता, शिक्षण, संस्कार आणि पुण्यकर्माचा संदेश दिला.

**अहमदनगर**मध्ये ईदगाह मैदान इथं सकाळी धार्मिक व्याख्यान, खुदबा आणि त्यानंतर मुस्लिम बांधवांनी सामुदायिक नमाज अदा केली. नमाजनंतर शहरातील कब्रस्तानं आणि दर्ग्यांमध्ये भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.

**<><><><><>**

१८व्या मिफ अर्थात मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचा आज तिसरा दिवस आहे. याविषयीचा अधिक वृत्तांत आमच्या प्रतिनिधीकडून....

**होल्ड--व्हाईस कास्ट...**

*मिफमध्ये आज प्रतिष्ठेच्या बर्लिन आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासाठी गेल्या काही वर्षांत निवडल्या गेलेल्या काही निवडक चित्रपटांसोबत रशिया, इराण, इटली इत्यादी देशांचे, तसंच भारतीय लघुपट, माहितीपट आणि ऍनिमेशनपट, ऑस्करसाठी निवडलेले लघुपट दाखवले जात आहेत. याअंतर्गत, २०२०मध्ये बर्लिन चित्रपट महोत्सवात दाखवलेल्या 'गुमनाम दिन' हा लघुपटाच्या दिग्दर्शक एकता मित्तल यांनी वार्ताहरांशी संवाद साधला. सामाजिक परिवर्तन आणण्यात माहितीपटांची भूमिका, स्त्रीकेंद्री कथानकं, कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्राचा माहितीपटांवर होणारा परिणाम, ॲनिमेशन आणि व्हिज्युअल इफेक्ट्स इत्यादी विषयांवरची चर्चासत्रं, परिसंवाद आणि कार्यशाळाही आज झाली. हा महोत्सव २१ जूनपर्यंत चालणार आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी, अंकिता आपटे, मुंबई.*

<><><><><>

पश्चिम बंगालच्या न्यु जलपायगुडी स्थानकाजवळ सियालदाहला जाणाऱ्या कांचनजंगा एक्सप्रेसला मालगाडीनं पाठीमागून धडक दिल्यानं झालेल्या अपघातात ९ जणांचा मृत्यू झाला, तर ३२ जण जखमी झाले आहेत. मृतांमध्ये ३ रेल्वे कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. अपघात झालेल्या ठिकाणचं बचाव कार्य पूर्ण झालं आहे. मालगाडी चालकानं सिग्नलकडे दुर्लक्ष केल्यानं हा अपघात झाल्याचं प्रथमदर्शनी निदर्शनाला आलं आहे, अधिक तपासनंतरच अपघाताचं नेमकं कारण समोर येईल, असं रेल्वे बोर्डाच्या अध्यक्ष जया वर्मा-सिन्हा यांनी सांगितलं.

या अपघातात जखमी झालेल्यांवर नॉर्थ बंगाल वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात उपचार सुरू आहेत. रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी घटनास्थळाची पहाणी केली. त्यानंतर त्यांनी रुग्णालयात जाऊन जखमींची विचारपूस केली. रेल्वेकडून मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी १० लाख रुपये, गंभीर जखमींना अडीच लाख रुपये, तर किरकोळ जखमींना ५० हजार रुपये देण्याची घोषणा त्यांनी केली.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. या अपघातातल्या मृतांच्या कुटुंबांना प्रधानमंत्री मदत निधीतून प्रत्येकी २ लाख रुपये, तर जखमींना ५० हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे.

<><><><><>

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामधल्या ६१ कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकण्याच्या निर्णयाला स्थगिती द्यावी, अशी मागणी महांडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी आज नवी मुंबईत वार्ताहर परिषदेत बोलताना केली.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात मराठवड्यात बऱ्याच ठिकाणी, कोकण आणि मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी, तर विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडला.

येत्या दोन दिवसात कोकणात बहुतांश ठिकाणी, विदर्भात बऱ्याच ठिकाणी, मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी, तर मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

**<><><><><>**